पंचायत समिती कागल
कार्यालय फोन क . ०२३२५--२४४०२२

जा.क्र/पंसका/जिग्रावियं/ 107 /2025 दि. 27/05/2025
Email ID- bdokagal१२३@gmail.com

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,

मा. सरपंच / ग्रामपंचायत अधिकारी,
सर्व ग्रामपंचायत ता. कागल जि. कोल्हापूर.

**विषय :- " सुंदर माझे घरकुल स्पर्धा " आयोजित करणे बाबत....**

संदर्भ :- १) जा.क्र/कोजग्राविय/वशि-७/घरकुल/७२/२०२५ दि. २६ मे २०२५.
मा.प्रकल्प् संचालक सो, यांचे पत्र.

उपरोक्त् संदर्भिय विषयास अनुसरुन कळविणेत येते की, सन – २०२४-२५ मध्ये आवास योजना ( ग्रामीण ) अंतर्गत मंजूर घरकुलाचे बांधकाम पूर्ण केलेल्या आपल्या ग्रामपंचायत कडील पूर्णतः बांधकाम झालेली घरकुले यांच्यात **" सुंदर माझे घरकुल स्पर्धा "** आयोजित करण्यात यावी. स्पर्धेचे मुख्य उद्दिष्ट् हे लाभर्थ्यांमध्ये घरकुल परिसर स्वच्छता, घराचे सौंदर्यकरण, हरित परिसर निर्माण करणे, पर्यावरणपूरक व नाविन्यपूर्ण बांधकाम आणि सार्वजनिक आरोग्य या बाबतीत जनजागृती निर्माण करणे हे आहे. या स्पर्ध्येबाबत पुढील बाबींची अंमलबजावणी करावी.

१. प्रत्येक लाभार्थ्यांची निवड करून स्पर्धा आयोजित करावी. ( मंजूर लाभार्थ्यांपैकी )
२. स्पर्धेसाठी घराचे सौंदर्यकरण, घरकुल परिसर स्वच्छता, पर्यावरणपूरक उपक्रम, बांधकामाचा दर्जा, मुदतीत बांधकाम पूर्ण इत्यादी निकष ठरवून मूल्यांकन करावे.
३. निवडलेल्या उत्त्म घरकुलांची माहिती, छायाचित्रे व स्पर्धेत भाग घेणा-या लाभार्थ्यांचे अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेत यावेत.
४. ग्रामपंचायती मार्फत स्थानिक पातळीवर निवड केलेल्या लाभार्थ्यांचा सन्मान समारंभ आयोजित करण्यात यावा.

तरी सर्व ग्रामपंचायत अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील संबंधित लाभार्थ्यांना याबाबत माहिती देवून, त्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करावा व स्पर्धेचे योग्य् नियोजन करावे.

गट विकास अधिकारी (वर्ग-1)
पंचायत समिती कागल